# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्र—कुलगुरू कार्यालय

परिपत्रक क्र ३५५/२०२०

विषय:— सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विद्यापीठे/संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करार (MOU) /करार (Agreement) करण्यासंदर्भातील कार्यपद्धतीबाबत.

आपणास विदित आहेच की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची ओळख भारतातील एक अव्वल दर्जाचे विद्यापीठ अशी असून, विद्यापीठाचे राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विद्यापीठे/संस्थांबरोबर सामंजस्य करार (MOU) / करार (Agreement) होत असतात. त्याबाबतची कार्यपद्धती संदर्भ क्र पी.व्ही.सी/३२, दि. १४/०३/२०१८ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे विहित करण्यात आली होती. सदरहू परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१. यापुढे सामंजस्य करार (MOU) / करार (Agreement) करण्यासंदर्भातील प्रस्ताव अथवा सामंजस्य कराराचा / कराराचा मसुदा संबंधित विभागप्रमुख यांनी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांचेमार्फत मा. प्र—कुलगुरू यांच्या कार्यालयाकडे पाठवावा.

२. विभागप्रमुखांकडून सामंजस्य करार / करार करण्यासंबंधीचा प्रस्ताव अथवा सामंजस्य कराराचा /कराराचा मसुदा मा. प्र—कुलगुरू कार्यालयाकडे आल्यानंतर तपासणीकरिता तो छाननी समितीपुढे ठेवण्यात येईल. छाननी समितीच्या शिफारशीनुसार या कार्यालयाकडून पुढील कार्यवाही केली जाईल.

३. आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार / करार यांची, छाननी समितीने शिफारस केल्यानंतर या कार्यालयाकडून तो शासनाकडे परवानगीसाठी पाठविला जाईल.

४. सामंजस्य करार / करार करण्यासंबंधीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेस या कार्यालयाकडून सादर करण्यात येईल. मा. व्यवस्थापन परिषदेने ठराव पारित केल्यानंतर संबंधित विभागप्रमुख यांना त्यासंदर्भात कळविण्यात येईल.

५. आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार / आंतरराष्ट्रीय करारांव्यतिरिक्त इतर सर्व सामंजस्य करार (MOU) / करार (Agreement) रू. ५००/— च्या स्टॅम्पपेपरवर तीन (०३) प्रतींमध्ये तयार करून, त्यावर संबंधित पक्षांच्या स्वाक्षऱ्या झाल्यानंतर त्याची एक मूळ प्रत या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर सामंजस्य करारावर संबंधित पक्षांच्या स्वाक्षऱ्या झाल्यावर एक प्रत संबंधित संस्थांना देण्यात यावी व एक प्रत संबंधित विभागाकडे ठेवण्यात यावी.

**तरी सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांनी उपरोक्त कार्यपद्धतीची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

(डॉ. एन.एस. उमराणी)
प्र—कुलगुरू

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ :— पी.व्ही.सी/ ६३५ )
दिनांक:— २४.१२.२०२० )

Desktop: rajiv shinde